(५)

**अहमदनगर येथील मे. चिफ ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट साहेब,**

**यांचे कोर्टात**

**एस. सी. सी. नं.**

/२०२४

**फिर्यादी**

मंगलदिप मल्टीस्टेट सोसायटी.

**आरोपी**

गौरव, [illegible]

**<u>या कमी फिर्यादी तर्फे पुरसीस कि,</u>**

सदर प्रकरण फिर्यादी यांनी एन.आय. ॲक्ट चे कलम १३८ नुसार दाखल केलेले आहे. सदर फिर्यादी यांची बँक हि **श्री वारणा सह. बँक ली.शाखा – अहमदनगर** ही असून सदर बँक हि **"तोफखाना पो. स्टे."** च्या हद्दीत येत आहे.

येणे प्रमाणे पुरसीस दिली असे.

**अहमदनगर**

**ता- ३० /१२/२०२४**

**ॲडव्होकेट**

Exh. 1



# अहमदनगर येथील मे. चिफ ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट साहेब, यांचे कोर्टात

**एस. टी. सी. नं.** scc 102/2025

**/२०२४** **फिर्यादी**

**मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि.**
**मंगलदीप इमारत, एकवीरा चौक, सावेडी, अहमदनगर**
राहुरी शाखा, अहमदनगर.
तर्फे व करीता अधिकृत प्रतिनिधी
श्री. सागर लक्ष्मण फुलारी
वय - २९ वर्षे, धंदा- नोकरी, रा. अहमदनगर
मो.नं. ९८९०३६७२३७.

**आरोपी**

**प्रेरणा जीवन धर्माधिकारी**
वय- ४५ वर्ष, धंदा- व्यावसाय,
रा. कोरडे गल्ली, लोणी खुर्द,
ता. राहाता, जि. अहमदनगर.
मो.नं. ९९२१२६०१३०.

**फिर्याद - निगोशिएबल इन्स्टुमेंट ॲक्टचे कलम १३८ प्रमाणे**
**याकामी फिर्यादी नम्रपूर्वक कळवितो ते येणेप्रमाणे**

| | |
|---|---|
| १. चेक देणाराचे नाव | प्रेरणा जीवन धर्माधिकारी |
| २. चेक कोणत्या बँकेचा | एच डी एफ सी बँक, शाखा –लोणी,अ.नगर. |
| ३. चेक नंबर व तारीख व रुपये | ०००१८, ता. ०४/११/२०२४, रु.३७,५००/- |
| ४. चेक भरल्याची तारीख- | ०६/११/२०२४ |
| ५. चेक परत आल्याची तारीख- | १२/११/२०२४ |
| ६. चेक परत आल्याचे कारण - | "फंडस इनसफिशियंट" |
| ७. नोटीस पाठविल्याची तारीख - | २५/११/२०२४ |
| ८ .नोटीस स्विकारली तारीख- | २८/११/२०२४ |

९. गुन्हा घडले कारण- ता. १२/११/२०२४ रोजी चेक परत आला त्यावेळी घडले,तदनंतर नोटीस पाठवून आरोपीने स्विकारली मात्र मुदतीत चेकची रक्कम आणून दिली नाही त्यावेळी घडले.

१०.कोणत्या पोलीस स्टेशन हद्दीत गुन्हा घडला- तोफखाना पोलीस स्टेशन, अहमदनगर.

१. फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. मुख्य कार्यालय मंगलदीप इमारत, एकवीरा चौक, सावेडी, अहमदनगर, राहुरी शाखा, जि. अहमदनगर ही संस्था मल्टीस्टेट को-ऑपरेटीव्ह सोसायटीज ॲक्ट २००२ अन्वये स्थापन झालेली सहकारी संस्था आहे. सदर संस्थेचे मुख्य कार्यालय मंगलदीप इमारत, एकवीरा चौक, सावेडी, अहमदनगर. येथे असुन इतर ठिकाणी शाखा आहे. फिर्यादी संस्थेचा कारभार सदरच्या कायद्यानुसार तसेच फिर्यादी संस्थेचे पोटनियमानुसार चालतो. फिर्यादी संस्थेच्या वतीने नोटीस पाठवणे फिर्यादी दाखल करणे, त्यावर सहया करणे, जबाब देणे, व्हेरिफिकेशन करणे, ॲफिडेव्हीट देणे व त्या संदर्भातील सर्व ती कायदेशीर कामे करणेबाबत फिर्यादी संस्थेचे मा. संचालक मंडळाने ठराव करुन श्री. सागर लक्ष्मण फुलारी यांना अधिकार दिलेले आहेत. तसा ठराव असुन त्याची प्रत सोबत दाखल केलेली आहे व त्या अधिकारात फिर्यादी संस्थेकरीता सदरची फिर्याद आणलेली आहे.

२. फिर्यादी संस्थेच्या वतीने तिचे सभासदांना तसेच नाममात्र सभासदांना उद्योग धंद्यासाठी, घर बांधकामासाठी, बचत गटासाठी, वाहन खरेदी तसेच इतर घरगुती कारणांसाठी कर्ज पुरवठा केला जातो. तसेच ठेवी गोळा करुन बँकींगचा सर्व प्रकारचा व्यवसाय केला होता.

३. आरोपी हे फिर्यादी संस्थचे सभासद आहेत. आरोपी यांनी फिर्यादी संस्थेकडून **बेकरीसाठी** कर्जावू रक्कम मिळावी म्हणून कर्जाची मागणी केलेली होती. त्यानुसार आरोपीची कर्जाची मागणी मंजुर करुन आरोपीस रक्कम **रुपये २०,०००/-** चे कर्ज मंजुर करुन कर्ज प्रकरणातील अटी व शर्तीवर **ता. ०५/०३/२०२२** रोजी अदा करण्यात आलेले आहे. सदर कर्जाची फेड आरोपीने त्यावरील होणाऱ्या व्याजासही ठरावीक मुदतीत करण्याचे मान्य व कबुल केलेले होते. मात्र आरोपीने कबुल केल्याप्रमाणे सदर रकमेची फेड न करता कर्जाची बाकी थकविलेली आहे. अनेकवेळा मागणी करुनही रक्कम देवू दिलावू करुन दिली नाही व रक्कम देण्याचे कामी टाळाटाळ केलेली आहे.

४. शेवटी आरोपीस थकबाकी रकमेची मागणी करता आरोपीने फिर्यादी संस्थेच्या कार्यालयात येवून आरोपीकडे असलेल्या थकबाकी रक्कम तसेच त्यावरील येणे असलेल्या व्याजाचा हिशोब करुन आरोपी यांनी त्यांचेकडे असणाऱ्या थकीत रकमेपोटी आरोपीने त्याचे खाते असलेले **एच डी एफ सी बँक, शाखा –लोणी, अ.नगर** या बँकेचा **चेक नं. ००००१८** रक्कम **रुपये ३७,५००/- चा ता. ०४/११/२०२४** रोजीचा दिला व सदरचा चेक खात्यात भरल्यानंतर निश्चित वटेल असा खात्री व भरवसा दिलेवरुन, आरोपीचे शब्दावर विश्वास ठेवून सदरचा चेक स्विकारला. सदरचा चेक फिर्यादी यांनी त्यांचे खाते असलेल्या **श्री. वारणा सह. बँक ली., शाखा – अहमदनगर** या बँकेत **ता. ०६/११/२०२४** रोजी भरला असता सदरचा चेक आरोपीचे खात्यात पुरेशी रक्कम शिल्लक नसल्याने आरोपीचे बँकेने **"फंडस इनसफिशियंट"** असा शेरा मारून **ता. १२/११/२०२४** रोजी परत पाठविला व तशी इंटीमिशन फिर्यादीस त्यांचे बँकेने देवून, त्यासोबत सदरचा चेक न वटता मेमोसहीत परत केलेला आहे.

५. सदरचा चेक न वटता परत आल्यानंतर फिर्यादीने आरोपीस वकीलामार्फत **ता.२५/११/२०२४** रोजी नोटीस पाठवून चेक डिसऑनर झाल्याबाबत कळविले व चेकच्या रकमेची मागणी केली असता सदरची नोटीस आरोपी यांनी **दिनांक २८/११/२०२४** रोजी स्विकारली. मात्र नोटीस मिळूनही आरोपी यांनी फिर्यादीस मुदतीत चेकची रक्कम आणून दिली नाही.

अशाप्रकारे आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम शिल्लक नाही याची माहिती व कल्पना आरोपीस असतांना देखील आरोपीने जाणीवपूर्वक सदरचा खोटा चेक देवून फिर्यादीची फसवणूक केलेली आहे व निगोशिएबल इन्स्टूमेंट ॲक्टचे कलम १३८ नुसार गंभीर स्वरुपाचा फौजदारी गुन्हा केलेला आहे म्हणून फिर्यादीची आरोपी विरुद्ध निगोशिएबल इन्स्टुमेंट ॲक्टचे कलम १३८ नुसार सदरची फिर्याद आहे.

**<u>तरी फिर्यादीची विनंती की.</u>**

आरोपीस जास्तीत जास्त कडक शासन तसेच दंड करण्यात यावा व दंडाच्या रकमेतून फिर्यादीस चेकची रक्कम अदा करण्याचा आदेश व्हावा. ही विनंती.

**<u>याकामी फिर्यादीतर्फे तुर्त साक्षी पुरावा खालीलप्रमाणे</u>**

१. **मा. शाखाधिकारी, एच डी एफ सी बँक, शाखा –लोणी,अ.नगर.** साक्षीस माहितगार इसमास हजर ठेवणे व येतांना आरोपीचे खात्याबाबत तसेच आरोपीने फिर्यादीस दिलेला वरील चेक फिर्यादीने त्यांचे खात्यात भरला असता तो न वटता परत आला त्या संदर्भातील सर्व माहिती व कागदपत्र घेवून साक्षीस हजर रहावे.

२. **मा. शाखाधिकारी, श्री. वारणा सह. बँक ली., शाखा – अहमदनगर**

साक्षीस माहितगार इसमास हजर ठेवणे व येतांना आरोपीने फिर्यादीस दिलेला वरील चेक फिर्यादीने त्यांचे खात्यात भरला असता तो न वटता परत आला त्यासंदर्भातील सर्व माहिती व कागदपत्र घेवून साक्षीस हजर रहावे. येणेप्रमाणे फिर्यादीतर्फे तुर्त साक्षीपुरावा असे. जादा पुरावा लागल्यास तो देण्याची फिर्यादी परवानगी असावी.

येणे प्रमाणे फिर्यादी यांची फिर्याद असे.

**अहमदनगर**

**दिनांक- ३०/१२/२०२४** **ॲडव्होकेट** **फिर्यादी**

भारतीय कोर्ट फी

भारत
500 रु.
पाँच
सौ रुपये

सत्यमेव जयते

INDIA
Rs.500
FIVE
HUNDRED
RUPEES

INDIA COURT FEE

महाराष्ट्र MAHARASHTRA

B 412152

7829 ता 30 DEC 2024

मुद्रांक विक्रेता
नगर लॉयर्स को-ऑप.सो.लि.करिता
न्यायमन्स न. २५/ १९९६

जिल्हा कोषागार कार्यालय
अहमदनगर
पु.दिनांक
09 DEC 2024
मु.प्र.लि.

भारतीय कोर्ट फी

भारत
200 रु.
दो
सौ रुपये

सत्यमेव जयते

INDIA
Rs.200
TWO
HUNDRED
RUPEES

INDIA COURT FEE

महाराष्ट्र MAHARASHTRA

B 126747

7830 13. 0 DEC 2024

मुद्रांक विक्रेता

लि.

2 4 DEC 2024

पु.दिनांक

पु.प्र.कि.

भारतीय कोर्ट फी

भारत
100 रु.
एक
सौ रुपये

INDIA
Rs.100
ONE
HUNDRED
RUPEES

सत्यमेव जयते

INDIA COURT FEE

महाराष्ट्र MAHARASHTRA

B 366037

7831 / 30 DEC 2024

नाव श्री

मुद्रांक विक्रेता
नगर लॉयर्स को-ऑप.सो.लि.करिता
लायसन्स नं. २५/१९९६

जिल्हा कोषागार कार्यालय
अहमदनगर
पु.दिनांक

01 AUG 2024

मु.प्र.लि.

Exh. 2

# वकील पत्र

अहमदनगर येथील मे. चिफ ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट साहेब,

scc 102/2025 यांचे कोर्टात

एस.सी.सी. नंबर /२०२४

**मंगलदिप मल्टीस्टेट सोसायटी** ------------ फिर्यादी

**विरुध्द**

प्रेरणा जीवन धर्माधिकारी ------------ आरोपी

सदरहू कामी मी / आम्ही **मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. मुख्य कार्यालय मंगलदीप इमारत, एकविरा चौक, पाईपलाईन रोड, सावेडी, अहमदनगर**

तर्फे व करीता अधिकृत प्रतिनिधी श्री. सागर लक्ष्मण फुलारी रा. एकविरा चौक, पाईप लाइन रोड,अहमदनगर, सदरील **फिर्यादी** यांनी या लेखावरून,

**अमित विजय राशिनकर** **डी.बी.नं. १२४**
अहमदनगर.
ॲडव्होकेट
**मो.नं.९६०४७७४१८८.**

यांस माझे / आमचे तर्फे हजर राहून वर लिहीलेल्या फिर्यादी चे कामी हजर राहण्यास आणि काम चालविणेस वकील नेमले आहे. या गोष्टीचे साक्षीकरीता आज दि. ३० माहे १२ सन २०२४ रोजी मी / आम्ही आपली सही./ आपला अंगठा केली/केला आहे.

कबूल करून दाखल.

**दिनांक-३०/१२/२०२४**

**ॲडव्होकेट**

Exh. 4

**अहमदनगर येथील मे. चिफ ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट साहेब,**

**यांचे कोर्टात**

scc 102/2025

**एस. सी. सी. नं नंबर /२०२४**

मंगलदिप मल्टीस्टेट सोसायटी. ------------ फिर्यादी

**विरुध्द**

[illegible] ---------------- आरोपी

**<u>या कमी फिर्यादी तर्फे पत्ता पुरसीस येणेप्रमाणे,</u>**

**मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि.**
**मुख्य कार्यालय मंगलदीप इमारत, एकविरा चौक, पाईप**
**लाईन रोड, सावेडी, अहमदनगर.**
तर्फे व करीता अधिकृत प्रतिनिधी
श्री. सागर लक्ष्मण फुलारी
रा. एकविरा चौक, पाईप लाइन रोड,अहमदनगर

येणे प्रमाणे पत्ता पुरसीस दिली असे.

**अहमदनगर**

**ता- ३०/१२/२०२४** **अॅडव्होकेट**

Exh. 3

**अहमदनगर येथील मे. चिफ ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट साहेब,**

**यांचे कोर्टात**

**एस. सी. सी. नं.** scc 102/2025

**/२०२४** **फिर्यादी**

मंगलदिप मल्टीस्टेट सोसायटी

**आरोपी**

[illegible]

**<u>या कमी फिर्यादी तर्फे दाखल कागद पत्रांची वर्णन यादी येणे प्रमाणे,</u>**

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १. | फिर्यादी यांचे नाबाचा ठराव | 30-12-24 |
| २. | मूळ चेक | 5-11-24 |
| ३. | मूळ चेक रिटर्न मेमो | 12-11-24 |
| ४. | रजि.नोटीस ची स्तळ प्रत | 25-11-24 |
| ५. | रजि.नोटीस पाठवले बाबत आर.एल.रिसीट | 25-11-24 |
| ६. | नोटीस मिळाले बाबत पोहोच पावती / ~~परत~~ आले~~ले ~~ पाकीट | 28-11-24 |
| ७. | आरोपीचा कर्ज खाते उतारा कलम ६३ चे प्रमाणपत्रासह | 26-12-24 |

येणे प्रमाणे फिर्यादी तर्फे एकूण ०७ कागद पत्रे दाखल केली असे.

**अहमदनगर**

**ता- 30 /१२/२०२४** **ॲडव्होकेट**

विश्वासाची अर्थसेवा

# मंगलदीप

मल्टीस्टेट अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसा. लि.

रजि.नं. : एमएससीएस/सीआर/३९७/२०११

हेड ऑफीस –

५, साई एन्क्लेव्ह, जुना पिंपळगांव रस्ता, एकवीरा चौक, पाईपलाईन रोड, सावेडी, अहमदनगर – ४१४००३.

फोन नं. : ०२४१-३५५२४४३

जावक क्रमांक :

शाखा : मुख्य शाखा

दिनांक : 30/12/24

(1)

## दि. १०/०२/२०२३ रोजी झालेल्या संचालक मंडळाचे सभेतील ठराव क्र.५ ची सत्यप्रत

विषय नं. ५ : सोसायटीचे वतीने न्यायालयीन व तत्सम कामकाज करणेसाठी वसुली अधिकारी श्री.सागर लक्ष्मण फुलारी यांची नेमणूक करून त्यांना अधिकार देणेबाबत.

ठराव नं. ५ : मागील काही वर्षांपासून सोसायटीचे न्यायालयीन कामकाजात वाढ झालेली असून विविध प्रकरणे दिवाणी न्यायालय,फौजदारी न्यायालय,लवाद प्राधिकरण,ग्राहक आयोग या ठिकाणी चालू आहेत व यापुढे देखील तत्सम प्रकरणे दाखल करावयाची आहेत.त्या अनुषंगाने सोसायटीचे वतीने कोर्ट व तत्सम कामकाज पाहण्यासाठी विस्तृतपणे अधिकार देण्याबाबत ठराव करणे आवश्यक आह सोसायटीचे वसुली अधिकारी श्री.सागर लक्ष्मण फुलारी यांना पुढील प्रमाणे अधिकार देण्यात येत आहेत. त्या करिता सोसायटीचे वतीने कर्जदार,जामिनदार व इतर यांचे विरुद्ध दिवाणी,फौजदारी,लवाद प्रकरणे,ग्राहक आयोग,तसेच निगोशिएबल इंस्ट्रुमेंट ॲक्ट अन्वये दाखल प्रलंबित असलेल्या,तसेच येथून पुढे नवीन दाखल करावयाच्या सर्व केसेसचे न्यायालयीन कामकाज पाहण्यासाठी वसुली अधिकारी श्री.सागर लक्ष्मण फुलारी यांची नेमणूक करून त्यांना अधिकार दिलेले आहेत.त्या अनुषंगाने खटले दाखल करणे,वकील पत्रावर सही करणे,प्रतिज्ञापत्र करणे,शपथेवर जबाब देणे, पुरावा दाखल करणे,वसुली दरखास्त दाखल करणे,तसेच कर्जदार अथवा जामीनदार यांनी थकित रक्कम सोसायटीकडे जमा केल्यावर त्या प्रकरणांमध्ये तडजोड करणे व त्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी सह्या करून प्रकरणे काढून घेणे, निगोशिएबल इंस्ट्रुमेंट ॲक्टचे कलम १३८ अन्वये द्यावयाच्या नोटीसवर सोसायटी करिता सही करणे,तसेच सोसायटीच्या वतीने किंवा सोसायटीचे विरुद्ध रिव्हिजन,अपिल यामध्ये न्यायालयीन कामकाज पहाणे त्यासाठी आवश्यक तेथे सह्या करणे,म्हणणे देणे,तसेच सोसायटीच्या विरुद्ध दाखल होणाऱ्या सर्व प्रकरणांमध्ये वरीलप्रमाणे सर्व अधिकार व अनुषंगीक सर्व अधिकार आज रोजी संचालक मंडळाचे (मासिक) सभेमध्ये मंजूर करणेत आलेल्या ठरावा अन्वये वसुली अधिकारी श्री.सागर लक्ष्मण फुलारी यांना देण्यात आलेले आहेत.

फिर्यादी तर्फे दाखल
ॲड.
ता.30/12/2024

ठराव सर्वानुमते मंजूर

सुचक :- श्री.भाऊसाहेब अंबादास कांडर

अनुमोदक: श्री.अण्णासाहेब नेमीदास चव्हाण

Mangaldeep Multistate Urban Co-op Credit Society Ltd / R.No. MSCS / CR / 397 / 2011

Chairman
Mangaldeep Multistate Urban Co-op Credit Society Ltd.Nirmalnagar.Savedi Ahmednagar.(M.S.)

**HDFC BANK**

BALAJI COMPLEX, NEAR AHILYABAI HOLKAR SCHOOL
LONI, TALUKA RAHATA, LONI-413736 MAHARASHTRA
RTGS / NEFT IFSC : HDFC0004493

04112024
D D M M Y Y Y Y
Valid for 3 months only

Pay Mangaldeep multi state urben co.op. credit soc. ltd. Or Bearer

Rupees रुपये Thirty seven thousand five hundred Rs. only — या धारक को

अदा करें ₹ 37,500/—

A/c No. खाता क्र. 50100336727970 Brn: 4493 Pdt: 1045 SAVING

Payable at par through clearing/transfer at all branches of HDFC BANK LTD

SHREE WARANA SAHAKARI BANK LTD. BR. AHMEDNAGAR

P.J.Dheni

PRERANA JEEVAN DHARMADHIKARI

Please sign above / कृपया यहाँ हस्ताक्षर करें

फिर्यादी तर्फे दाखल
ॲड.
ता. ३/१२/ २०२३

⑈000018⑈ 413240503⑆ 004351⑈ 31

710533

SHREE WARANA
SAHAKARI BANK LTD.
BR. AHMEDNAGAR

- 6 NOV

CLEARING

# SHREE WARANA SAHAKARI BANK LTD.

Br. AHMEDNAGAR

To: Mangaldeep multistate Urban Co-op credit Soc. ltd.

The enclosed cheque / refund order / pay order / draft 000018 is / are returned for the following reason (s)

| CODE NO. | REASON FOR RETURN | CODE NO. | REASON FOR RETURN |
|---|---|---|---|
| (01- 09) | **Funds** | (60- 69) | **Crossing / Endorsement** |
| 01 ✓ | Funds insufficient ✓ | 60 | Crossed to two banks |
| 02 | Exceeds Arrangement | 61 | Crossing / clearing stamp not cancelled |
| 03 | Effects not cleared; present again | 62 | instrument specially crossed to... |
| 04 | Refer to Drawer | 63 | Amount in protective crossing incorrect / illegible / required |
| 05 | | 64 | Payee's endorsement required / irregular / requires collecting bank's confirmation |
| 06 | | | |
| (10 -19 ) | **Signature** | 65 | Endorsement by mark / thumb impressing require attestation by Drawer / Megistrate with seal |
| 10 | Drawer's Signature incomplete / illegible / differs / required | 66 | |
| 11 | Drawer's Signature / authority to operate account not received | 67 | |
| 12 | Alteration require drawer's authentication | (70 - 79) | **RBI / Government** |
| 13 | | 70 | Advice not received,Amount / Name differs on advice |
| 14 | | 71 | Drawee bank's fund with sponser bank insufficient |
| (20- 29) | **Stop Payment** | 72 | Payee's separate discharge to bank required |
| 20 | Payment stopped by drawer | 73 | Not payable till 1st proximo |
| 21 | Payment stopped by attchement order/court order | 74 | Pay / Order / Cheque require counter signature |
| 22 | Withdrawal stopped owning to death / lunacy / inseivency of account holder | 75 | |
| 23 | | 76 | |
| (30- 49) | **Instrument** | (80- 89) | **Miscellaneous** |
| 30 | Instrument post dated / out dated / undated / without proper date | 80 | Bank's certificate ambigurous / incomplete / required |
| 31 | Instrument mutilated; requires bank's guarantee | 81 | Draft lost by issuing office; confirmation required from issuing office |
| 32 | Cheque irregularly drawn | | |
| 33 | Encoding / listing error | 82 | 'Payee's a/c Credited' - stamp required |
| 34 | Clearing house stamp / date required | 83 | Fake / forged / stolen draft / cheque / cash order / Interest Warrant / Divident Warrant |
| 35 | Wrongly deliverred / not drawn on us | | |
| 36 | Present proper zone | 84 | Other reasons |
| 37 | Instrument contains extraneous matter | | |
| 38 | Weekly off | | |
| 39 | | | |
| (50- 59) | **Account** | | |
| 50 | Account closed / transferred to... | | |
| 51 | No such account | | |
| 52 | Title of account required / Title of account wrong / incomplete | | |
| 53 | Account blocked | | |
| 54 | | | |
| 55 | | | |

CHEQUE NO.(S) 000018 ✓ (3) AMOUNT Rs 37500/-

फिर्यादी तर्फे दाखल
अॅड.
ता. 30/12/2023

Sahakari Bank Ltd.

(5)

**अमित विजय राशिनकर**
बी.एस.एल.एलएल.बी.
ॲडव्होकेट

टेबल क्र.४३,वकील कक्ष क्र. ५
जिल्हा न्यायालय,अहमदनगर
मो.नं. ९६०४७७४१

RLAD 4141050105 <414003>
RLAD A RM292795340IN
Counter No:1,OP-Code:UBER
To:PRERANA DHARMADHIKAR,
LONI RAHATA, PIN:413713
From:ADV. A.V.RASHINKAR , AHMEDNAGAR
Wt:20grams,
Amt:30.00 ,25/11/2024 ,16:55
<<Track on www.indiapost.gov.in>>

(5)

फियादी तर्फे दाखल
ॲड.
ता. ३०/१२/२०२४

नोटीस रजिस्ट

प्रति,

**प्रेरणा जीवन धर्माधिकारी**
रा. कोरडे गल्ली, लोणी खुर्द,
ता. राहाता , जि. अ.नगर.
मो.नं. ९९२१२६०१३०.
पिन.४१३७१३.

यांसी

आमचे आशिल **मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप क्रेडीट सोसायटी लि.** मंगलदीप इमारत, एकविरा चौक, सावेडी, अहमदनगर, शाखा- राहुरी, जि. अहमदनगर यांसतर्फे अधिकृत प्रतिनिधी श्री. सागर लक्ष्मण फुलारी रा. अहमदनगर यांनी समक्ष येऊन प्रत्यक्ष दिलेल्या माहितीवरून सांगितलेवरून व दाखविलेल्या कागदपत्रावरून **श्री. अमित विजय राशिनकर**, ॲडव्होकेट, अहमदनगर यांच्याकडुन तुम्हास सदरच्या नोटीसीने कळविण्यात येते की,

आमचे आशिल मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को ऑप क्रेडीट सोसायटी लि. मंगलदीप इमारत, एकविरा चौक, सावेडी, अहमदनगर ही मल्टीस्टेट को-ऑपरेटीव्ह सोसायटीज ॲक्ट २००२ अन्वये स्थापन झालेली सोसायटी असुन तीचा कारभार सदर कायदयानुसार तसेच आमचे आशिल सोसायटीचे पोटनियमानुसार चालतो. आमचे अशिल संस्थेचे मुख्य कार्यालय मंगलदीप इमारत, एकविरा चौक, सावेडी, अहमदनगर इथे असुन विविध ठिकाणी शाखा आहेत. आमचे आशिल संस्थेचे वतीने तीचे सभासदांना तसेच नाममात्र सभासदांना उदयोग धंदयासाठी वाहन खरेदीसाठी, घर बांधकामासाठी, बचत गटासाठी तसेच इतर घरगुती अडचणीसाठी कर्ज पुरवठा केला जातो तसेच ठेवी गोळा करून बँकींग स्वरुपाचा सर्व प्रकारचा व्यवसाय केला जातो.

तुम्ही आमचे आशिल संस्थेचे सभासद आहात. तुम्ही आमचे अशिल संस्थेकडुन **बेकरी साठी** कर्जाऊ रक्कम मिळावी म्हणुन कर्जाची मागणी केलेली होती त्यानुसार तुमची कर्जाची मागणी मंजुर करून आमचे आशिल संस्थेने तुम्हांस रक्कम **रुपये २०,०००/-** चे कर्ज कर्ज प्रकरणातील अटी व शर्तीवर मंजुर करुन तारीख **०५/०३/२०२२** रोजी अदा केलेले आहे. सदर कर्जाऊ रक्कम तुम्ही त्यावरील होणारे व्याजासहीत ठराविक मुदतीत त्यावरील होणारे व्याजासहीत हप्त्याने पेड करण्याचे मान्य व कबुल केलेले होते. कर्जाची वेळेत फेड न केल्यास थकबाकी झाल्यास दंड व्याज आकारण्याचा देखील नियम असुन

दंडव्याज देण्याचे देखील तुम्ही मान्य केलेले आहे. तसेच मुदतीत रक्कम फेड न केल्यास त्या अनुषंगाने संस्थेस काही वसुली करीता काही कारवाई करावी लागल्यास त्याचे खर्चाची रक्कम देण्याचे देखील तुम्ही मान्य व कबुल केलेले आहे. मात्र तुम्ही कबुल केलेप्रमाणे कर्जाची रक्कमेची फेड न करता कर्जाची बाकी थकविलेली आहे. अनेकवेळा मागणी करूनही रक्कम देऊ दिलाऊ करून दिली नाही व रक्कम देण्याचे कामी टाळाटाळ केलेली आहे.

शेवटी तुम्हास सदरील थकबाकी रक्कमेची मागणी करता तुम्ही आमचे आशिल संस्थेचे कार्यालयात येऊन तुमचे खाते असलेल्या **एच डी एफ सी बँक, शाखा- लोणी, अहमदनगर** या बँकेचा चेक **नंबर ०००११८** रक्कम **रुपये ३७,५००/-** चा तारीख **०४/११/२०२४** रोजीचा आमचे आशिल संस्थेत आणुन दिला व सदरचा चेक खात्यात भरल्यानंतर तो निश्चित वटेल अशी खात्री व भरवसा विलेक्शान तुमचे शब्दावर विश्वास ठेऊन आमचे आशिल संस्थेने सदरचा चेक स्विकारला. सदरचा चेक आमचे आशिल संस्थेने त्यांचे खाते असलेल्या **श्री. वारणा सह. बँक लि. शाखा- अहमदनगर** या बँकेत तारीख **०६/११/२०२४** रोजी भरला असता सदरचा चेक तुमचे खात्यात पुरेशी रक्कम शिल्लक नसल्याने तुमचे बँकेने **" फंडस इनसफिशियंट "** असा शेरा मारून तारीख **१२/११/२०२४** रोजी मेमोसहीत न वटता परत आलेला आहे.

आशाप्रकारे चेक देतांना तुमचे खात्यात पुरेशी रक्कम शिल्लक नाही याची माहिती व कल्पना असतांनाही तुम्ही जाणीवपुर्वक न वढणारा खोटा चेक देऊन आमचे आशिल संस्थेची फसवणुक केलेली आहे व निगोसिएबल इन्स्ट्रूमेंट ॲक्टचे कलम १३८ नुसार गंभीर स्वरुपाचा फौजदारी गुन्हा केलेला आहे.

सबब सदरच्या नोटीसीद्वारे तुम्हास कळविण्यात येते की सदरची नोटीस तुम्हास मिळताच १५ दिवसाचे आत चेकची रक्कम **रुपये ३७,५००/-** तसेच या नोटीसीचा खर्च अशी होणारी सर्व रक्कम आमचे आशिल संस्थेत आणुन जमा करावी व रितसर पावती घेऊन जावी. असे करण्यास कसुर केल्यास मात्र आमचे आशिल संस्था तुमचे विरुद्ध चेक न वटल्याबाबत निगोशिएबल इन्स्ट्रमेंट ॲक्टचे कलम १३८ नुसार फौजदारी कारवाई करतील व तदनंतर होणारे सर्व खर्चाची व परिणामाची सर्वस्वी जबाबदारी ही तुमचेवर राहील याची नोंद घ्यावी. विनाकारण नोटीस देण्यास भाग पाडले सबब सदरच्या नोटीसीचा खर्च रुपये १०००/- तुमचे शिरावर ठेवला असुन स्थळप्रत ऑफिस दप्तरी ठेऊन अस्सल तुंम्हास रजिस्टर पोष्टाने रवाना केली असे.

**तारीख -२५/११/२०२४**

**अहमदनगर**

**ॲडव्होकेट**

फिर्यादी तर्फे दाखल
ॲड.
ता. ३/२/ २०२३

आर॰पी॰-54/R.P.-54/आर॰पी॰-54

भारतीय डाक विभाग
DEPARTMENT OF POSTS, INDIA
भारतीय टपाल खाते

* अनावश्यक को काट दिया जाए
* Strike out if not relevant
* लागू नसलेले खोडावे

प्राप्ति स्वीकृति/ACKNOWLEDGEMENT/ अभि स्वीकृति

रजिस्ट्री-पत्र/पार्सल प्राप्त हुआ।
Received Registered Letter/Parcel
पंजीकृत पत्र/पार्सल मिळाले

क्र. /No./ अ. क्र. ______ तारीख/ Dated/दिनांक ______ का/of/चा

* बीमे का मूल्य रुपयों में
* Insured for Rupees ______ को/on/ला
* विम्याची किंमत रुपयात

पाने वाले / Addressed / प्राप्तकर्ता
प्रेरणा जीवन धर्माधिकारी
रा. कोरडे गल्ली, लोणी खुर्द.
ता. राहाता, जि. अ.नगर

28.1(?).24

वितरण डाकघर की तारीख-मोहर
Date stamp of office of delivery
वितरण पोस्ट ऑफीसचा दिनांक शिक्का

हस्ताक्षर और नाम/
Signature and Name/
सही व नाव

भारतीय डाक
India Post

फिर्यादी तर्फे दाखल (6)
अ‍ॅड.
ता. २०/११/२०२३

प्रेषक डाकघर की नाम-मोहर
**Name-stamp of office of posting**
प्रेषक पोस्ट ऑफीसचा नावाचा शिक्का

डाक सेवार्थ
**On Postal Service**

To,

अ‍ॅड. अमित वि. साळुंखे
33, विजयश्री, शिवनगर
शिव मंदीराजवळ, निर्मलनगरजवळ
अहमदनगर, मो. 9604774188

पिन/PIN/पिन

MANGALDEEP MULTISTATE URBAN CO.OP.CR.SOC.LTD - HO

Sai Enclave. First Flower. Pipeline Road. A.nagar-414003. Ph No.0241-2423397

MSCS/CR/397/2011

## Account Statement

From **05.03.2022 To 26.12.2024**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Name : | Mrs.Dharmadhikari Prerna Jivan | Tenure : | 12 | First Installment Date : | 05/04/2022 |
| Acc No : | 1111/710533 | Loan Amt : | 20,000.00 | Open Date : | 05/03/2022 |
| Client no : | 316420 | Installment Amount : | 1,901.00 | Status : | Open |
| Purpose : | Business Expensess. | Interest Rate : | 25.00 % p.a | | |

Guardian employee

Approval officer : WADEKAR SOMNATH BABANRAO

Guarantor :

Mr.Bhagwat Swati Rajendra

Mrs.Aher Nirmala Yogesh

Mrs.Dukre Kanchan Shailesh

Mrs.Sonawane Vijaya Nivrutti

Permanent address A/P. Loni Kh,Korde Galli,Tal-Rahata,Dist-Ahmadnagar,Pin-413713

Loni Kh, Loni Kh., Rahta, Ahmadnagar

Mob. 9921260130 Tel.

Mangaldeep Multistate Urban Co-op Credit Society Reg.No.MSCS/CR/397/2011 Ahmednagar

| Sr. | Date | | Narration | Debit | Credit | Balance |
|---|---|---|---|---|---|---|
| Opening Balance :**0.00 Cr** | | | | | | |
| 1 | 05/03/2022 | JV | Loan Amunt Tr. To Saving AC.572/7845 | 20,000.00 | 0.00 | 20000.00 Dr |
| 2 | 31/03/2022 | JV | Interest posting 05.03.2022 To 31.03.2022 | 370.00 | 0.00 | 20370.00 Dr |
| 3 | 06/04/2022 | Cr | | 0.00 | 1,901.00 | 18469.00 Dr |
| 4 | 30/04/2022 | JV | Interest posting 01.04.2022 To 30.04.2022 | 386.00 | 0.00 | 18855.00 Dr |
| 5 | 07/05/2022 | JV | Micro Loan Penalty Charges. (100/30=3000/-) | 100.00 | 0.00 | 18955.00 Dr |
| 6 | 31/05/2022 | JV | Interest posting 01.05.2022 To 31.05.2022 | 402.00 | 0.00 | 19357.00 Dr |
| 7 | 07/06/2022 | JV | | 100.00 | 0.00 | 19457.00 Dr |
| 8 | 30/06/2022 | JV | Interest posting 01.06.2022 To 30.06.2022 | 399.00 | 0.00 | 19856.00 Dr |
| 9 | 06/07/2022 | Cr | | 0.00 | 1,000.00 | 18856.00 Dr |

| Sr. | Date | | Narration | Debit | Credit | Balance |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Carry forward Balance | 18,856.00 Dr | |
| 10 | 30/07/2022 | JV | Interest posting 01.07.2022 To 30.07.2022 | 391.00 | 0.00 | 19247.00 Dr |
| 11 | 08/08/2022 | JV | | 100.00 | 0.00 | 19347.00 Dr |
| 12 | 31/08/2022 | JV | Interest posting 31.07.2022 To 31.08.2022 | 423.00 | 0.00 | 19770.00 Dr |
| 13 | 07/09/2022 | JV | Micro Loan Penalty Charges(100/25=2500/-) | 100.00 | 0.00 | 19870.00 Dr |
| 14 | 30/09/2022 | JV | Interest Posting (m) 01.09.2022 To 30.09.2022 | 408.00 | 0.00 | 20278.00 Dr |
| 15 | 07/10/2022 | JV | Micro Loan Penalty Charges(100/54=5400/-) | 100.00 | 0.00 | 20378.00 Dr |
| 16 | 31/10/2022 | JV | Interest Posting (m) 01.10.2022 To 31.10.2022 | 432.00 | 0.00 | 20810.00 Dr |
| 17 | 08/11/2022 | JV | Micro Loan Penalty Charges(100/48=4800/-) | 100.00 | 0.00 | 20910.00 Dr |
| 18 | 30/11/2022 | JV | Interest posting 01.11.2022 To 30.11.2022 | 429.00 | 0.00 | 21339.00 Dr |
| 19 | 07/12/2022 | JV | Micro Loan Penalty Charges(100/30=3000/-) | 100.00 | 0.00 | 21439.00 Dr |
| 20 | 31/12/2022 | JV | Interest Posting (m) 01.12.2022 To 31.12.2022 | 455.00 | 0.00 | 21894.00 Dr |
| 21 | 07/01/2023 | JV | Micro Loan Penalty Charges,(100/37=3700/-) | 100.00 | 0.00 | 21994.00 Dr |
| 22 | 31/01/2023 | JV | Interest Posting (m) 01.01.2023 To 31.01.2023 | 467.00 | 0.00 | 22461.00 Dr |
| 23 | 07/02/2023 | JV | Micro Loan Penalty Charges,(100/59=5900/-) | 100.00 | 0.00 | 22561.00 Dr |
| 24 | 28/02/2023 | JV | Interest posting 01.02.2023 To 28.02.2023 | 432.00 | 0.00 | 22993.00 Dr |
| 25 | 07/03/2023 | JV | Micro Loan Penalty Charges,(100/51=5100/-) | 100.00 | 0.00 | 23093.00 Dr |
| 26 | 31/03/2023 | JV | Interest posting 01.03.2023 To 31.03.2023 | 490.00 | 0.00 | 23583.00 Dr |

| Sr. | Date | | Narration | Debit | Credit | Balance |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Carry forward Balance | 23,583.00 Dr | |
| 27 | 07/04/2023 | JV | Micro Loan Penalty Charges,(100/35=3500/-) | 100.00 | 0.00 | 23683.00 Dr |
| 28 | 10/04/2023 | JV | MICRO LOAN OVERDUE NOTICE POSTAGE EXP. | 500.00 | 0.00 | 24183.00 Dr |
| 29 | 29/04/2023 | JV | Interest posting 01.04.2023 To 29.04.2023 | 477.00 | 0.00 | 24660.00 Dr |
| 30 | 08/05/2023 | JV | Micro Loan Penalty Charges,(100/16=1600/-) | 100.00 | 0.00 | 24760.00 Dr |
| 31 | 31/05/2023 | JV | Interest posting 30.04.2023 To 31.05.2023 | 542.00 | 0.00 | 25302.00 Dr |
| 32 | 07/06/2023 | JV | Micro Loan Penalty Charges. (100/34=3400/-) | 100.00 | 0.00 | 25402.00 Dr |
| 33 | 30/06/2023 | JV | Interest posting 01.06.2023 To 30.06.2023 | 522.00 | 0.00 | 25924.00 Dr |
| 34 | 31/07/2023 | JV | Interest posting 01.07.2023 To 31.07.2023 | 550.00 | 0.00 | 26474.00 Dr |
| 35 | 11/08/2023 | JV | Micro Loan Penalty Charges.. (100/50=5000/-) | 100.00 | 0.00 | 26574.00 Dr |
| 36 | 31/08/2023 | JV | Interest posting 01.08.2023 To 31.08.2023 | 564.00 | 0.00 | 27138.00 Dr |
| 37 | 16/09/2023 | JV | Micro Loan Penalty Charges. (100/118=11800/-) | 100.00 | 0.00 | 27238.00 Dr |
| 38 | 30/09/2023 | JV | Interest posting 01.09.2023 To 30.09.2023 | 559.00 | 0.00 | 27797.00 Dr |
| 39 | 31/10/2023 | JV | Interest posting 01.10.2023 To 31.10.2023 | 590.00 | 0.00 | 28387.00 Dr |
| 40 | 30/11/2023 | JV | Interest posting 01.11.2023 To 30.11.2023 | 583.00 | 0.00 | 28970.00 Dr |
| 41 | 01/12/2023 | JV | Micro Loan Penalty Charges. (100/110=11000/-) | 100.00 | 0.00 | 29070.00 Dr |
| 42 | 30/12/2023 | JV | Interest posting 01.12.2023 To 30.12.2023 | 597.00 | 0.00 | 29667.00 Dr |

| Sr. | Date | | Narration | Debit | Credit | Balance |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Carry forward Balance | 29,667.00 Dr | |
| 43 | 03/01/2024 | JV | Micro Loan Penalty Charges. (100/108=10800/-) | 100.00 | 0.00 | 29767.00 Dr |
| 44 | 31/01/2024 | JV | Interest posting 31.12.2023 To 31.01.2024 | 652.00 | 0.00 | 30419.00 Dr |
| 45 | 03/02/2024 | JV | Micro Loan Penalty Charges. (100/105=10500/-) | 100.00 | 0.00 | 30519.00 Dr |
| 46 | 29/02/2024 | JV | Interest posting 01.02.2024 To 29.02.2024 | 606.00 | 0.00 | 31125.00 Dr |
| 47 | 04/03/2024 | JV | Micro Loan Penalty Charges. (100/104=10400/-) | 100.00 | 0.00 | 31225.00 Dr |
| 48 | 30/03/2024 | JV | Micro Loan Penalty Charges. (100/102=10200/-) | 100.00 | 0.00 | 31325.00 Dr |
| 49 | 30/03/2024 | JV | Interest posting 01.03.2024 To 30.03.2024 | 641.00 | 0.00 | 31966.00 Dr |
| 50 | 30/04/2024 | JV | Micro Loan Penalty Charges. (100/102=10200/-) | 100.00 | 0.00 | 32066.00 Dr |
| 51 | 02/05/2024 | JV | Interest posting 31.03.2024 To 30.04.2024 | 679.00 | 0.00 | 32745.00 Dr |
| 52 | 31/05/2024 | JV | Interest posting 01.05.2024 To 31.05.2024 | 695.00 | 0.00 | 33440.00 Dr |
| 53 | 01/06/2024 | JV | Micro Loan Penalty Charges. (100/100=10000/-) | 100.00 | 0.00 | 33540.00 Dr |
| 54 | 29/06/2024 | JV | Interest posting 01.06.2024 To 29.06.2024 | 666.00 | 0.00 | 34206.00 Dr |
| 55 | 01/07/2024 | JV | Micro Loan Penalty Charges. (100/97=9700/-) | 100.00 | 0.00 | 34306.00 Dr |
| 56 | 31/07/2024 | JV | Micro Loan Penalty Charges. (100/97=9700/-) | 100.00 | 0.00 | 34406.00 Dr |
| 57 | 31/07/2024 | JV | Interest posting 30.06.2024 To 31.07.2024 | 752.00 | 0.00 | 35158.00 Dr |
| 58 | 31/08/2024 | JV | Micro Loan Penalty Charges. (100/96=9600/-) | 100.00 | 0.00 | 35258.00 Dr |

| Sr. | Date | | Narration | Debit | Credit | Balance |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Carry forward Balance | 35,258.00 Dr | |
| 59 | 31/08/2024 | JV | Interest posting 01.08.2024 To 31.08.2024 | 747.00 | 0.00 | 36005.00 Dr |
| 60 | 30/09/2024 | JV | Micro Loan Penalty Charges. (100/95=9500/-) | 100.00 | 0.00 | 36105.00 Dr |
| 61 | 03/10/2024 | JV | Interest posting 01.09.2024 To 30.09.2024 | 740.00 | 0.00 | 36845.00 Dr |
| 62 | 31/10/2024 | JV | Micro Loan Penalty Charges. (100/94=9400/-) | 100.00 | 0.00 | 36945.00 Dr |
| 63 | 31/10/2024 | JV | Interest posting 01.10.2024 To 31.10.2024 | 781.00 | 0.00 | 37726.00 Dr |
| 64 | 13/11/2024 | JV | TRF.CHEQUE RETURN CHARGES | 500.00 | 0.00 | 38226.00 Dr |
| 65 | 30/11/2024 | JV | Micro Loan Penalty Charges.. (100/94=9400/-) | 100.00 | 0.00 | 38326.00 Dr |
| 66 | 30/11/2024 | JV | Interest posting 01.11.2024 To 30.11.2024 | 781.00 | 0.00 | 39107.00 Dr |
| 67 | 04/12/2024 | JV | TRF.ADVOCATE NOTICE POSTAGE EXP. | 800.00 | 0.00 | 39907.00 Dr |
| | | | Total Cr/Dr Amount : | 42,808.00 | 2,901.00 | 39,907.00 Dr |

Mangaldeep Multistate Urban Co-op. Credit Society Ltd.Ahmednagar (M.S.)

फिर्यादी तर्फे दाखल

ॲड.

ता30/12/2024

# CERTIFICATE U/S 63 OF B.S.A.

The contents of account statement is true and correct, as per written and computerized record maintained by the company. The statement produced herein contents the entries regularly made and stored in the computer regularly used for maintaining accounts. The entries are regularly féd into the computer in ordinary course of maintaining of accounts. During the period to which the account statement refers to, the system that stored such data had not broken down, and was properly operating and functioning. The printout is taken of the account statement in ordinary course of business.

I certify that, I know the system of computers that is used for maintaining of storing entries for the accounting purpose, and that the statement is reproduces through a printing Machine connected to the computer, to the best of my own knowledge and belief.

Hence certified that the account statement is true & correct.

Date :- 18/12/2024
Ahmednagar

Multistate Urban Co-op Credit Society Ltd. Reg.No.MSCS/CR/397/2011 Ahmednagar

फिर्यादी तर्फे दाखल
ॲड.
ता.30/12/2023

Exh. 5

# अ.नगर येथील मे. चिफ ज्युडिशियल मैजिस्ट्रेट साहेब, यांचे कोर्टात,

एस. सी. सी. नं.

scc 102/2025

/२०२४

**फिर्यादी**

मंगलदीप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि.

**आरोपी**

प्रेरणा जीवन धर्माधिकारी

**<u>याकामी फिर्यादीतर्फे केसचे चौकशीचे कामी सरतपासाचे ॲफिडेव्हीट खालीलप्रमाणे</u>**

मी श्री. सागर लक्ष्मण फुलारी, वय - ३० वर्षे, धंदा- नोकरी, रा. एकविरा चौक, अहमदनगर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

१. फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. मुख्य कार्यालय मंगलदीप इमारत, एकवीरा चौक, सावेडी, अहमदनगर, राहुरी शाखा अहमदनगर ही संस्था मल्टीस्टेट को-ऑपरेटीव्ह सोसायटीज ॲक्ट २००२ अन्वये स्थापन झालेली सहकारी संस्था आहे. सदर संस्थेचे मुख्य कार्यालय मंगलदीप इमारत, एकवीरा चौक, सावेडी, अहमदनगर, येथे असुन इतर ठिकाणी शाखा आहे. फिर्यादी संस्थेचा कारभार सदरच्या कायद्यानुसार तसेच फिर्यादी संस्थेचे पोटनियमानुसार चालतो. फिर्यादी संस्थेच्या वतीने नोटीस पाठवणे,फिर्यादी दाखल करणे, त्यावर सहया करणे, जबाब देणे, व्हेरिफिकेशन करणे, ॲफिडेव्हीट देणे व त्या संदर्भातील सर्व ती कायदेशीर कामे करणेबाबत फिर्यादी संस्थेचे मा. संचालक मंडळाने ठराव करुन मला अधिकार दिलेले आहेत. तसा ठराव असुन त्याची प्रत सोबत दाखल केलेली आहे व त्या अधिकारात फिर्यादी संस्थेकरीता सदरची फिर्याद मी आणलेली आहे. व सदरचे प्रतिज्ञापत्र त्या अधिकारात दिलेले आहे. मा. संचालक मंडळाने मला दिलेल्या अधिकाराबाबत मंजुर ठरावाची सत्यप्रत मी आज रोजी दाखल करीत असुन त्यावर मा. चेअरमन साहेब यांची सही आहे, ती मी ओळखतो. त्यातील मजकुर खरा व बरोबर असून त्यास निशाणी देण्यात यावी.

______0______
Read and Recorded

IRSHAD MOHMADRAFIK NAIKWADI
Digitally signed by IRSHAD MOHMADRAFIK NAIKWADI
Date: 2025.01.15 16:15:07 +0530

Assistant Superintendent
Chief Court, Ahmednagar

२. फिर्यादी संस्थेच्या वतीने तिचे सभासदांना तसेच नाममात्र सभासदांना उद्योग धंद्यासाठी, घर बांधकामासाठी, बचत गटासाठी, वाहन खरेदी, तसेच इतर घरगुती कारणांसाठी कर्ज पुरवठा केला जातो. तसेच ठेवी गोळा करुन बँकींगचा सर्व प्रकारचा व्यवसाय केला होता.

३. आरोपी हे फिर्यादी संस्थचे सभासद आहेत. आरोपी यांनी फिर्यादी संस्थेकडून **बेकरीसाठी** कर्जावू रक्कम मिळावी म्हणून कर्जाची मागणी केलेली होती. त्यानुसार आरोपीची कर्जाची मागणी मंजुर करुन आरोपीस रक्कम **रुपये २०,०००/-** चे कर्ज मंजुर करुन कर्ज प्रकरणातील अटी व शर्तीवर **ता. ०५/०३/२०२२** रोजी अदा करण्यात आलेले आहे. आरोपी यांचा कर्ज मागणी अर्ज, कर्ज रोखा, जामीन रोखा, प्रॉमीसरी नोट ही कागदपत्र अर्जासोबत वर्णनयादी सोबत आज रोजी दाखल केलेले असून त्यावर आरोपी यांची कर्जदार या नात्याने तसेच त्यांचे जामीनदार यांच्या जामीनदार या नात्याने सहया असून, संस्थेचे मॅनेजर तसेच चेअरमन यांच्या सहया असुन त्या सहया मी ओळखतो, त्यातील मजकुर हा खरा व बरोबर आहे, त्यास निशाणी देवून पुराव्याचे कामी वाचण्यात यावे. सदर कर्जाची फेड आरोपीने त्यावरील होणाऱ्या व्याजासही ठरावीक मुदतीत करण्याचे मान्य व कबुल केलेले होते. मात्र आरोपीने कबुल केल्याप्रमाणे सदर रकमेची फेड न करता कर्जाची बाकी थकविलेली आहे. अनेकवेळा मागणी करुनही रक्कम देवू दिलावू करून दिली नाही व रक्कम देण्याचे कामी टाळाटाळ केलेली आहे.

४. शेवटी आरोपीस थकबाकी रकमेची मागणी करता आरोपीने फिर्यादी संस्थेच्या कार्यालयात येवून आरोपीकडे असलेल्या वकवाकी रक्कम तसेच त्यावरील येणे असलेल्या व्याजाचा हिशोब करुन आरोपी यांनी त्यांचेकडे असणाऱ्या थकीत रकमेपोटी आरोपीने त्याचे खाते असलेले **एच डी एफ सी बँक, शाखा –लोणी,अ.नगर.** या बँकेचा **चेक नं. ००००१८** रक्कम **रुपये ३७,५००/-** चा **ता. ०४/११/२०२४** रोजीचा दिला व सदरचा चेक खात्यात भरल्यानंतर निश्चित वटेल असा खात्री व भरवसा दिलेवरुन,

Assistant Superintendent
Chief Court, Ahmednagar

आरोपीचे शब्दावर विश्वास ठेवून सदरचा चेक स्विकारला. आरोपी यांनी दिलेला अस्सल चेक वर्णन यादी समवेत दाखल केलेला आहे. त्यावर आरोपी यांची सही असुन ती मी ओळखतो. चेकवरील मजकुर हा खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी देवून पुराव्याचे कामी वाचण्यात यावे. सदरचा चेक फिर्यादी यांनी त्यांचे खाते असलेल्या **श्री. वारणा सह. बँक ली., शाखा – अहमदनगर** या बँकेत **ता. ०६/११/२०२४** रोजी भरला असता सदरचा चेक आरोपीचे खात्यात पुरेशी रक्कम शिल्लक नसल्याने आरोपीचे बँकेने **"फंडस इनसफिशियंट"** असा शेरा मारुन **ता. १२/११/२०२४** रोजी परत पाठविला व तशी इंटीमिशन फिर्यादीस त्यांचे बँकेने देवून, त्यासोबत सदरचा चेक न वटता मेमोसहीत परत केलेला आहे. आरोपीच्या बँकेचा मेमो तसेच फिर्यादी यांचे बँकेने दिलेली इंटीमेशन वर्णनयादी समवेत दाखल केलेली आहे. त्यावर संबंधित बँकेचे शिक्के तसेच संबंधित अधिकारी यांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर हा खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी देवून पुराव्याचे कामी वाचण्यात यावे.. सदरचा चेक न वटता परत आल्यानंतर फिर्यादीने आरोपीस वकीलामार्फत **ता. २५/११/२०२४** रोजी नोटीस पाठवून चेक डिसऑनर झाल्याबाबत कळविले व चेकच्या रकमेची मागणी केली असता सदरची नोटीस आरोपी यांनी **दिनांक २८/११/२०२४** रोजी स्विकारली. आरोपीस पाठविलेल्या नोटीसची स्थळ प्रत सदरील केसचे कामी वर्णनयादी समवेत दाखल केलेली आहे. त्यावरील मजकुर हा खरा व बरोबर आहे. त्यावर माझे वकीलांची सही असुन ती मी ओळखतो. नोटीस मधील मजकुर हा खरा व बरोबर आहे. तरी त्यास निशाणी देवून पुराव्याचे कामी वाचण्यात यावे. आरोपीस नोटीस मिळाल्याची पोस्टाची पोहोच पावती वर्णनवादी समवेत दाखल केलेली आहे. त्यावर आरोपी यांची सही असुन ती मी ओळखतो. तरी त्यास निशाणी देवून पुराव्याचे कामी वाचण्यात यावे. मात्र नोटीस मिळूनही आरोपी यांनी फिर्यादीस मुदतीत चेकची रक्कम आणून दिली नाही.

Assistant Superintendent
Chief Court, Ahmednagar

५. आज रोजी सरतपासाचे प्रतिज्ञापत्राबरोबर आरोपीचे कर्ज खात्याचा खाते उतारा, भारतीय साक्ष अधिनियम चे कलम ६३ चे प्रमाणपत्रासह दाखल करत असून त्यावर माझी सही असून ती मी ओळखतो. त्यातील मजकुर खरा व बरोबर असून त्यास निशाणी देवून पुराव्याकामी वाचण्यात यावे. ही नम्र विनंती.

अशाप्रकारे आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम शिल्लक नाही याची माहिती व कल्पना आरोपीस असतांना देखील आरोपीने जाणीवपूर्वक सदरचा खोटा चेक देवून फिर्यादीची फसवणूक केलेली आहे व निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टचे कलम १३८ नुसार गंभीर स्वरुपाचा फौजदारी गुन्हा केलेला आहे म्हणून फिर्यादीची आरोपी विरुद्ध निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टचे कलम १३८ नुसार सदरची फिर्याद आहे.

**तरी फिर्यादीची विनंती की,**

आरोपीस जास्तीत जास्त कडक शासन तसेच दंड करण्यात यावा व दंडाच्या रकमेतून फिर्यादीस चेकची रक्कम अदा करण्याचा आदेश व्हावा. ही विनंती.

येणेप्रमाणे वरील संपूर्ण मजकुर माझे माहितीप्रमाणे खरा व बरोबर असून त्याचे सत्यतेसाठी मी आज रोजी याखाली माझी सही केली असे.

**अहमदनगर**

**दिनांक-** 26 **/१२/२०२४** **ओळख** **ॲफिडेव्हीट करणार**

**ॲड. राशिनकर अमित विजय**

Solemnly affirmed before me namely
by Sagar Laxman Fulari age-30-occu-service.
Who is identified before me
by A.A.I.-A.V. Rashinkar Pipeline Road. A.Nagar.
or whom I Personally know.
Dt. 27/12/2024

Assistant Superintendent
Chief Court, Ahmednagar